**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. यंदा जनता परिवर्तन घडविणार-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांचे नागपुरात प्रतिपादन; पुर्व नागपूर, तिरोडा आणि काटोल येथे प्रचार सभांना उपस्थिती.
2. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा प्रसिद्ध.
3. भाजपनेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांत ५० प्रचार सभा घेणार.
4. अमरावतीच्या तिवसा दर्यापूर येथे उद्धव ठाकरे, तर यवतमाळ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा.

---------------------------------

**शरद पवार विदर्भ दौरा**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी- शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार आज विदर्भ दौऱ्यावर असून, त्यांनी आज पुर्व नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा विधानसभा मतदारसंघातील महविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ सभांना संबोधित केले. ते नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार दुनेश्वर पेठे यांच्या प्रचार सभेला संबोधित करतांना महाराष्ट्रातून उद्योगाचे पलायन झाले असून पंतप्रधान हे एका राज्याचे नसून ते संपूर्ण देशाचे आहे हे लक्षात घ्यायला हवं असं प्रतिपादन करून महायुती सरकारवर त्यांनी टीका केली. यावेळी त्यांनी महाविकास आघाडीच्या पाच गॅरंटी ची माहिती मतदारांना दिली. ज्यामध्ये दरमहा ३००० रुपये महालक्ष्मी योजनेतून महिलांना दिले जातील, महिलांना बसमधून मोफत प्रवास, शेतकऱ्यांना तीन लाख पर्यंतची कर्जमाफी, जातीनिहाय जनगणना, आरक्षणाची मर्यादा 50 टक्के वाढविण्याचा प्रयत्न तसेच बेरोजगारी भत्ता म्हणून दर महिन्याला चार हजार रुपये या ग़ॅरंटीचा समावेश होता. पूर्व नागपूर मधून दुनेश्वर पेठे हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असून त्यांच्यापुढे सलग तीन वेळा या मतदारसंघातून विजयी झालेले भाजपचे विद्यमान आमदार कृष्णा खोपडे यांच आवाहन राहणार आहे. याच मतदारसंघात आभा पांडे या महायुती मधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांन

बंडखोरी केली आहे. या सभेनंतर गोंदियाच्या तिरोडा विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार  रविकांत बोपचे यांच्या  प्रचार सभेला शरद पवार यांनी संबोधित केले. यावेळी पाच वर्षाच्या पूर्वी लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाला एक जागा मिळाली होती. आणि राष्ट्रवादीचा 4 जागा मिळाल्या होत्या मात्र आता जी लोकसभा निवडणुक झाली त्यात परिवर्तन घडले जवळपास 38 जागा मिळाल्या असे पवार यांनी सांगितल्.  खतांच्या किमती वाढल्या असुन शेतकऱ्यांच्या मालाला किंमत मिळत नाही  देशातील शेतकरी अस्वस्थ झाला असून आपल्याला शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढायचं असल्याच त्यांनी सांगितल. दरम्यान, या सभेनंतर  काटोल विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार सलील देशमुख यांच्या प्रचारार्थ सभा आज सायंकाळी बाजार  समिती फल्ली मार्केट  काटोल येथे आयोजित करण्यात आली आहे.

-----------------------------------

वचननामा/उद्धव ठाकरे/चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आज मुंबई इथून आपला वचननामा प्रसिद्ध केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी या वचननाम्याचं प्रकाशन झालं. रोजगार आणि धारावी पुनर्वसन हे मुद्दे या वचननाम्यात नमूद आहेत. हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा येत्या काही दिवसात जाहीर होईल, असं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले. दरम्यान, अडीच वर्षे घरात बसून फेसबुक लाईव्ह करणाऱ्या उद्धव ठाकरेंनी मातोश्रीत बसून उबाठा गटाचा वचन नामा प्रकाशित केला अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. नेता घरात नाही तर लोकांच्या दारात शोभून दिसतो असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

-----------------------------------

फिरतं प्रदर्शन

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी राबवण्यात येणाऱ्या स्वीप कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो आणि भारत निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन उद्यापासून सुरु होणार आहे. प्रदर्शन लावलेल्या या गाड्या १५ निवडक जिल्ह्यांमधे मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत. उद्या मुंबईत एका सोहळ्यात भारत निवडणूक आयोग तसंच राज्याच्या  मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी,  चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या

मान्यवरांच्या उपस्थितीत मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. याच कार्यक्रमात या फिरत्या प्रदर्शन वाहनांना हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे.

---------------------------------

तृतीयपंथी मतदार

निवडणूक प्रक्रियेत मतदानाच्या माध्यमातून सर्वांचा सहभाग असावा, कुठलाही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक विभागाकडून मतदानवाढीसाठी सर्व माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून तृतीयपंथी मतदारांनाही मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहे. नागपूर जिल्हयात एकूण ३०२ तृतीयपंथी मतदार आहेत. यात सर्वाधिक १०४ मतदार हे उत्तर नागपूर विधानसभा मतदारसंघांतर्गत आहेत. अंतिम मतदार यादीनुसार तृतीयपंथी मतदारांची शहरातील सहा विधानसभा मतदारसंघातील संख्या ही २४४ अशी आहे. यात नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात २९, नागपूर दक्षिण ८, नागपूर पूर्व ३२, नागपूर मध्य ४०, नागपूर पश्चिम ३१ आणि नागपूर उत्तर मतदारसंघात १०४ अशी एकूण शहरांतर्गत मतदारसंघात २४४ एकूण तृतीयपंथी मतदार आहेत. तर ग्रामीण भागातील विधानसभानिहाय मतदारसंघात ५८ तृतीयपंथी मतदार आहेत.

---------------------------------

आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज अकोला आणि वाशीम जिल्हयातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

---------------------------------

नितीन गडकरी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील भाजपा आणि महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आजपासून आरंभ करत आहेत. येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांत गडकरी यांच्या तब्बल ५० जाहीरसभा होतील. तसेच 16, 17 आणि 18 नोव्हेंबर या काळात अर्थात निवडणूक प्रचाराच्या अंतिम टप्प्यात देखील गडकरींच्या प्रचार सभांचे नियोजन केले जात आहे. या सर्व जाहिरसभा भव्य स्वरूपात व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र प्रदेश भाजपने जय्यत तयारी केली आहे. दरम्यान आज संध्याकाळी सात वाजता नितीन गडकरी कोतवाल नगर चौक येथे रात्री आठ वाजता पश्चिम

नागपुरातील बोरगाव येथे आणि रात्री नऊ वाजता उत्तर नागपूरातील नागपूर सुधार प्रण्यास ऑफिसच्या वैशालीनगर येथे भाजप उमेदवारांच्या प्रचार कार्यालयाच उद्घाटन करणार आहे

-----------------------------------

उद्धव बाळासाहेब ठाकरे अमरावती दौरा/देवेंद्र फडणवीस

आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात आपण किमान त्रासात शेतकऱ्यांना कर्जमुक्त केलं आणि त्याचा कुठेही गाजावाजा केला नाही, कारण ते आपलं कर्तव्य होतं. महायुतीच्या सरकारला निवडणुकीच्या तोंडावर योजना आठवतात असा टोला शिवसेनाप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी लगावला ते आज अमरावती जिल्हा दौऱ्यावर असून दर्यापूर इथं महाविकास आघाडीचे उमेदवार गजानन लवटे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. अमरावती जिल्ह्यात त्यांच्या आज तीन ठिकाणी सभा संपन्न होत आहेत तिवसा इथल्या सभेत काँग्रेसच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्यासाठी ते प्रचार करत आहेत. दरम्यान, यवतमाळच्या उमरखेड मधील भाजपा उमेदवार किशन वानखेडे यांच्या प्रचारार्थ फुलसावंगी, यवतमाळ येथे भाजपाचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभा घेतली. यवतमाळमध्ये रस्ते, रेल्वेचे जाळे उभारणार आणि नवीन सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे आश्वासन फडणवीस यांनी दिले. वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भात 10 लाख एकर शेतजमिनीला कयमस्वरूपी ओलिताखाली आणण्याचे काम आपल्या सरकारने सुरु केल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

-----------------------------------

प्रचारसभांचे आयोजन

राज्यात विधानसभा निवणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रचारसभांचे आयोजन करण्यात आले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी, कर्नाटकाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, तेलंगाणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासह काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार असल्याची माहिती कॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी आज मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे हे पाच दिवस महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून १३, १४, १६, १७ व १८ नोव्हेंबरला राज्यातील विविध भागात त्यांच्या सभा होतील. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे १२, १४ व १६ नोव्हेंबर रोजी प्रचार सभा घेणार

**असल्याचं चेंनिथला यांनी सांगितलं. १० नोव्हेंबर रोजी कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहिरनामा प्रसिद्ध केला जाणार असल्याचेही ते म्हणाले.**

**-----------------------------------**